# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - ११५/२०२५ दिनांक ११/०३/२०२५

## प्रेसनोट

### पुरुष वेश्यादलालांच्या ताब्यातुन तीन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर पथकास यश.

दिनांक १०/०३/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, मिरा-भाईंदरला यांना त्यांचे बातमीदारकडून वेश्यादलाल मनोज श्रीवास्तव हा वेश्याव्यवसाय करीत असुन त्याचे मोबाईलवर पुरुष गिऱ्हाईकांने संपर्क साधला की, तो मुलींचे हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना फोटो पाठवुन, पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल मनोज श्रीवास्तव याने सांगितल्याप्रमाणे पिझ्झा हट, डेल्टा गार्डन बिल्डींग, शॉप नं.०९/१०,एमआयडीसी रोड, काशिमिरा, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १८.१५ वा. छापा टाकला असता, यातील पुरुष वेश्यादलाल मनोज विश्वराम श्रीवास्तव, वय-४७ वर्ष, सध्या रा. ६११, डि आर-३, एम.एम.आर.डि.ए. बिल्डींग, राम मंदीर रोड, मव्हीस्टार जवळ, गोरेगाव प., मुंबई, मुळ रा. ग्राम- बैराखास, पोस्ट- लक्ष्मण पट्टी, ता. ज्ञानपुर, जि. भदोई, राज्य-उत्तरप्रदेश याने ०३ पिडीत मुली/महिलांना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम वेश्यादलाल याने स्वत: स्वीकारल्याने त्यास मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०३ पिडित मुली/महिलांची सुटका केली. सदर बाबत ताब्यातील वेश्यादलाल मनोज विश्वराम श्रीवास्तव यांचेविरुध्द सफौ/ राजाराम आसवले यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ११४/२०२५, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दि.११.०३.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, सफौ/उमेश पाटील, सफौ/अनिल पवार, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पोशि/केशव शिंदे, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे व मपोशि/तृषा कटकधोंड, सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर यांनी केली आहे.

-----------------00----------------------